माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०४८/२०१७-१८
दि.२३/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.बी.एल.अगरवाल, श्री कालाभैरव उपासना मंडल, ...............अपिलार्थी
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड,
भाईदर (प.), ता.जि.ठाणे.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.बी.एल.अगरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१३/०३/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) सन २००२ पासून २०१७-१८ पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नगररचनाकार म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती व त्यांचा कार्यकाल.

२) सन २००२ पासून २०१७-१८ पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नगररचना विभागामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती व त्यांचा कार्यकाल.

३) नगररचनाकार यांना प्रभारी आयुक्त म्हणून अधिकार दिले असल्यास सदर आदेशाची प्रत देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती आस्थापना विभागाकडून मिळणे अपेक्षित असताना आस्थापना विभागाने माहिती अधिकार अर्ज नगररचना विभागाकडे वर्ग केलेला आहे. नगररचना विभागाकडे माहिती मागितली असता आमच्याकडे माहिती देण्यासाठी वेळ नाही असे उत्तर दिले आहे. याकरिता अपिलार्थी यांनी दि.१९/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२५५/२०१८ दि.२२/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माहिती अधिकार अंतर्गत माहिती आस्थापना विभागाकडून मिळणे अपेक्षित असताना आस्थापना विभागाने माहिती अधिकार अर्ज नगररचना विभागाकडे वर्ग केलेला आहे. नगररचना विभागाकडे माहिती मागितली असता आमच्याकडे माहिती देण्यासाठी वेळ नाही असे उत्तर दिले आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी १० दिवसांत मुद्देनिहाय माहिती विनाशुल्क स्वरुपात अपिलार्थी अर्जदारास देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रति:-

१) श्री.बी.एल.अगरवाल, श्री कालाभैरव उपासना मंडल,
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.